‘‘आधुनिक मराठी कादंबरीतील शिक्षकांचे जीवनदर्शन : एक विवेचक अभ्यास’’

(निवडक साहित्यकृतीच्या आधारे)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी शोधप्रबंधाचा प्रारुप आराखडा

संशोधक

श्री. वाघमोडे नरसिंग सोपानराव

गोपाळ नगर, रिंगरोड, लातूर. ता.जि. लातूर.

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे

मराठी विभाग प्रमुख

शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव,

ता.चाकूर, जि.लातूर. (महाराष्ट्र)

मार्च २०१६

-: अनुक्रमणिका :-

अ.क्र.	तपशील	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	१,२,३
२	संशोधन विषयाचे महत्त्व	३, ४
३	संशोधन विषयाच्या अभ्यासाचा हेतू	४
४	संशोधनाची गृहितके	५
५	संशोधन विषयाची सामग्री	५, ६
६	संशोधनाच्या मर्यादा	६
७	संशोधन पध्दती	६, ७
८	शोधप्रबंधाची प्रकरणे	७
९	मूळ आधारभूत ग्रंथसूची	८
१०	संदर्भसूची	९, १०

❋ **संशोधकाचे नाव**	:	श्री. वाघमोडे नरसिंग सोपानराव गोपाळ नगर, रिंग रोड, लातूर.
❋ **मोबाईल नंबर**	:	९८५००४०३५४
❋ **ई-मेल**	:	nswagmode66@gmail.com
❋ **जात प्रवर्ग**	:	S.C. (अनु. जाती)
❋ **विषय**	:	मराठी
❋ **संशोधन विषयाचे शीर्षक**	:	''आधुनिक मराठी कादंबरीतील शिक्षकांचे जीवनदर्शन : एक विवेचक अभ्यास'' (निवडक साहित्यकृतीच्या आधारे)
❋ **मार्गदर्शकाचे नाव**	:	प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे (मराठी विभाग प्रमुख) शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर, जि. लातूर
❋ **मोबाईल नंबर**	:	८६९८५५४४०३
❋ **ई-मेल**	:	

"आधुनिक मराठी कादंबरीतील शिक्षकांचे जीवनदर्शन : एक विवेचक अभ्यास" (निवडक साहित्यकृतीच्या आधारे)

❋ प्रस्तावना :

शिक्षक हा समाजाचा शिल्पकार म्हणून ओळखला जातो. सामाजिक जीवनाच्या निर्मितीत शिक्षकांचे स्थान सर्वोच्च राहिले आहे. प्राचीन काळापासून गुरुचे महत्त्व वाङ्‍मयातून सुस्पष्ट झाले आहे. भारतीय समाज व संस्कृतीत गुरुपरंपरेला विशेष महत्त्व आहे. शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचारांचा व त्यांच्या संस्काराचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडतो. सामाजिक जीवनमूल्यांच्या उभारणीत शिक्षकांचे स्थान अधिक महत्त्वाचे राहिले आहे. हे लक्षात घेऊन आधुनिक मराठी कादंबरीतून शिक्षकांच्या जीवनाकडे पाहता येईल, इतके दर्जेदार, गुणात्मक व भरीव असे लेखन मराठी कादंबरीतून झाल्याचे दिसून येते.

खरे तर साहित्य निर्मितीमध्ये शिक्षक, प्राध्यापक यांचाही साहित्यिक म्हणून सहभाग राहिला आहे. शिक्षकीपेशा हे एक व्रत आहे. या पेशाशी निष्ठा ठेवून कार्य करणाऱ्या शिक्षकांमधूनच अत्यंत दर्जेदार अशा साहित्यकृती निर्माण झाल्याचे दिसून येते. शिक्षकी पेशात असलेल्या लेखकांनी मोठ्या प्रमाणात शिक्षक या नायकाचे जीवन त्याने लिहिलेल्या कादंबरीतून चित्रित केल्याचे दिसून येते.

आधुनिक काळात कादंबरी या वाङ्‍मयप्रकारात जे भरीव लेखन झाले आहे, त्यामध्ये शिक्षक या नायकाला अनेक साहित्यकृतीतून महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. किंबहुना शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी असेल तर ते सामाजिक जीवनात बदल घडविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते. शिक्षक हा एक विचारप्रवर्तक व्यक्ती असून चांगला माणूस, एक आदर्श नागरिक घडविण्यात त्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. यादृष्टीने विचार करताना संशोधक अभ्यासकाला अधिक महत्त्वाचे वाटते.

शिक्षक हा साहित्यकृतीचा नायक म्हणून कसा आहे, याचा सर्वांगीण विचार करावा, साहित्यकृतीतून घडलेले शिक्षकांचे जीवन सुस्पष्ट करून सांगावे, शिक्षकांचे सामर्थ्य व त्यांच्या मर्यादांची ओळख व्हावी, तसेच शिक्षक या नायकाचा विचार लेखक कसा करतात ते आत्मसात करण्याबरोबरच कादंबरी या वाङ्‍मयप्रकारातून साकार झालेले शिक्षकांचे जीवनदर्शन यथार्थपणे मांडण्यासाठी प्रस्तूत विषयाची निवड अभ्यासकाने केली आहे.

मराठी कादंबरीतील शिक्षक हा वैविध्यपूर्ण व अनेक अंगांनी चित्रित झालेला दिसून येतो. शिक्षकाचे शिक्षण, शैक्षणिक चिंतन, शिक्षकाचे वास्तव जीवनातील स्थान, स्वरुप, महत्त्व या बरोबरच शिक्षक ज्या वातावरणात वावरतो ते सभोवतालचे वातावरण आदि संदर्भाने प्रभावी असे लेखन मराठी कादंबरीतून झाले असून शैक्षणिक जीवनाबरोबरच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचेही यथार्थ दर्शन कादंबरी या वाङ्‍मयप्रकारातून घडते. या एकूण पार्श्वभूमीचा आधार घेऊन सामाजिक जीवनात शिक्षकांचे स्थान, महत्त्व,

शिक्षकांचे विचार, चिंतन, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन, साहित्यिकांच्या कल्पनेतून चित्रित झालेले जीवनानुभव संशोधक अभ्यासकाला अधिक महत्त्वाचे वाटतात. हे लक्षात घेऊन अभ्यासकाने शिक्षकांचे जीवनदर्शन साहित्यकृतीतून कसे घडते ते शोधण्याच्या भूमिकेतून प्रस्तूत विषयाची निवड केली आहे.

कादंबरी हा एक अत्यंत लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकारात मराठी साहित्यात विपुल असे लेखन झाले आहे. कादंबरीत सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब असते. कादंबरीचा कालावकाश मोठा असतो. मानवी जीवनाचे समग्र दर्शन कादंबरीतून घडते. यास्तव कादंबरीची व्याप्ती मोठी असते. हे कादंबरीचे गुणविशेष लक्षात घेऊन कादंबरीतून घडणाऱ्या शिक्षकांच्या जीवनाचे चित्रण व वास्तव जीवन कसे आहे ते पाहता येते.

शिक्षकांचे प्रभावी असे जीवनदर्शन घडवणाऱ्या मराठी कादंबरीत ज्या साहित्यकृती आहेत त्यातील निवडक अशा वीस साहित्यकृतींची निवड अभ्यासकाने केली असून त्यातील महत्त्वाच्या साहित्यकृती पुढीलप्रमाणे आहेत.

क्र.	**कादंबरी**		**लेखक**
१)	हद्दपार	–	श्री.ना. पेंडसे
२)	बनगरवाडी	–	व्यंकटेश माडगुळकर
३)	मास्तर	–	अण्णाभाऊ साठे
४)	दूर गेलेले घर	–	लक्ष्मीकांत तांबोळी
५)	प्रवाह	–	महादेव मोरे
६)	हऱ्या नाऱ्या	–	त्र्यंबक असरडोहकर
७)	जरीला	–	भालचंद्र नेमाडे
८)	झुल	–	भालचंद्र नेमाडे
९)	गावचा टिनोपाल गुरुजी	–	शंकरराव खरात
१०)	मी मुक्त मी मुक्त	–	शंकरराव खरात
११)	कातळावरचे दिवस	–	श्रीपाद काळे
१२)	झळाळ	–	डॉ. विजया बर्वे
१३)	दुःखाचे श्वापद	–	रंगनाथ पठारे
१४)	कोंडणातलं जिणं	–	नागनाथ पाटील
१५)	कुरुक्षेत्र	–	ह.मो. मराठे
१६)	उघड	–	वामनराव आवळे
१७)	खरे मास्तर	–	विभावरी शिरूरकर
१८)	प्रतिदिन	–	कृष्णचंद्र ज्ञाते

१९) पागोरा - रमेश अंधारे

२०) पार्टटाईम - प्रतिमा इंगोले

* संशोधन विषयाचे महत्त्व :

कादंबरी हा मराठी साहित्यातील समृध्द जीवनदर्शन घडवणारा लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकारात पेशाने शिक्षक असलेल्या आणि शिक्षण क्षेत्राचा सखोल अनुभव घेतलेल्या प्रतिभावंत लेखकांनी शिक्षक हा नायक आपल्या कलाकृतीत चित्रित केला आहे. या साहित्यकृतीतून घडणाऱ्या शिक्षकांचे जीवनदर्शन संशोधकाला अत्यंत महत्त्वाचे वाटते. सामाजिक जीवनाच्या आणि राष्ट्रनिर्मितीच्या उभारणीत शिक्षकांचा फार मोठा वाटा राहिला आहे. त्यांचे हे स्थान लक्षात घेता साहित्यातील शिक्षक आणि त्यांचे जीवनदर्शन संशोधकाला अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटते.

मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यात शिक्षणसंस्था ही अत्यंत महत्त्वाची आणि मूलभूत अशी संस्था असून ती शिक्षकांच्या प्रत्यक्ष कार्यातून सामाजिक जीवन निर्माण करते. या क्षेत्रात राहून कार्य करणाऱ्या शिक्षकांनी आपले जे जीवनानुभव साहित्यातून चित्रित केलेले आहेत ते आत्मसात करून प्रस्तूत विषयावर केलेले संशोधन हे नव्या समाजनिर्मितीचा ध्यास घेणाऱ्या अभ्यासक संशोधकास दिशादर्शक ठरू शकेल, असे अभ्यासकाला वाटते.

शिक्षक केवळ अध्ययन आणि अध्यापनच करतात असे नव्हे. त्यांच्या हातून साहित्य निर्मितीही होते. चिंतनशील शिक्षकाने लिहिलेले साहित्य हे शिक्षणाचे पवित्र क्षेत्र आणि शैक्षणिक जीवनप्रवाह अधिक निकोप होण्यास मदत होऊ शकते. कारण संस्कारक्षम शिक्षकांच्या जीवनातूनच आदर्श नागरिक घडत असतो. किंबहुना साहित्यातील शिक्षकांचा जीवनविषयक दृष्टिकोन अधिक सुस्पष्ट करून सांगणे संशोधक अभ्यासकाला महत्त्वाचे वाटते.

मराठी साहित्यात शिक्षकांचे जीवनचित्रण शिक्षकांनी जसे केले आहे, तसे अन्य क्षेत्रातील साहित्यिकांनीही गंभीरपणाणे शिक्षकांच्या जीवनाकडे पाहिले आहे. शिक्षकांविषयी सामाजिक जीवनात असलेला आदर लक्षात घेता शिक्षकाने कसे असावे? काय करावे? यासंदर्भात अत्यंत मौलिक अशी माहिती विविध साहित्यकृतीतून मिळते. ही माहिती लक्षात घ्यावी, शिक्षकांविषयीचे जीवनचिंतन करावे आणि आपले विचार यथार्थपणे प्रबंधातून मांडावेत, असे अभ्यासकाला वाटते.

शिक्षक हा समाजाचा शिल्पकार, राष्ट्राचा निर्माता म्हणून त्याचा गौरव होतो. परंतु ज्या परिस्थितीत, ज्या शैक्षणिक क्षेत्रात आणि ज्या समाजात तो वावरतो, त्या प्राप्त परिस्थितीत त्याला अनेक अनुकूल-प्रतिकुल अनुभवांना तोंड द्यावे लागते. शिक्षकांच्या जीवनात अनेक आव्हाने आहेत, अनेक अडचणी आहेत. ती कोणत्या प्रकारची आहेत, याचे प्रभावी चित्रण कादंबरी या वाङ्मयप्रकारात विपुलप्रमाणात झाले आहे. हे चित्रण कसे आहे त्याचा सुसंगत लेखाजोखा वस्तुनिष्ठ स्वरुपात मांडणे अभ्यासकाला महत्त्वाचे वाटते.

राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात ज्या घडामोडी घडतात त्याचे परिणाम शिक्षण क्षेत्रावर होत असतात. कालौघात त्याचे कळत-नकळत परिणाम शिक्षकांच्या जीवनावरही होत असतात. त्यांच्या जीवनावर होणारे हे परिणाम विचारप्रवर्तक असून कादंबरीतील घटीत घटनांच्या आधारे शिक्षकांच्या जीवनाचे विवेचक दर्शन घडविणे संशोधक अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

* संशोधन विषयाच्या अभ्यासाचा हेतू :

साहित्यातील कोणतीही कलाकृती ही अनन्यसाधारण असते. हे तिचे अनन्यसाधारणत्त्व तिच्या आशय विषयाबरोबरच त्यात चित्रित झालेल्या वेगवेगळ्या समस्यात असते. एका विषयावरील कलाकृती सारख्या वाटत असल्या तरी या विषयाकडे प्रत्येक लेखकाचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो. मराठी कादंबरी लेखकांनी त्यांनी जगलेले, भोगलेले, पाहिलेले, अनुभवलेले जीवन आपल्या कादंबरीचा विषय केले. आधुनिक मराठी कादंबरीतून शिक्षकांच्या ज्या जाणिवा निर्माण झाल्या, त्या प्रत्येक कलाकृतीत लेखकांनी त्यांच्या अनुभवांच्या, विचारांच्या आणि वैचारिक प्रेरणांच्या भूमिकेतून कादंबरी लेखन केले आहे. म्हणूनच शिक्षकांच्या वैचारिक आणि त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाची चिकित्सा करणे, त्यांच्या वास्तव स्थितीचा शोध घेणे, परिस्थितीने निर्माण झालेल्या शिक्षकांच्या प्रश्नांची उकल करून त्यांची कारणमीमांसा करणे हा या संशोधनामागील हेतू आहे. हा हेतू साध्य करण्यासाठी काही निवडक साहित्यकृती निवडून त्यांची प्रातिनिधिक स्वरुपात प्रश्न व समस्यांची चर्चा करताना बदललेल्या शिक्षकांच्या जीवनदर्शनाचा शोध घेणे हा प्रमुख हेतू आहे.

मानवी जीवनाची व्याप्ती मोठी असल्याने त्यातील शिक्षकांच्या जीवनाचे स्वरूप विवधांगी असल्याचे दिसते. त्यातील भिन्नतेची कारणे शोधून ती स्पष्ट करण्याच्या हेतूने प्रस्तूत विषय अभ्यासकाने निवडला आहे. कादंबरीतून चित्रित झालेले शिक्षकांच्या अंतरंगाचे व बहिरंगाचे दर्शन प्रभावी झालेले आहे. आचार्य, गुरु, शिक्षक, सर या शब्दांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन काळाच्या ओघात बदललेला आहे. आधुनिकतेमुळे, ज्ञान-विज्ञानाच्या कक्षा रुंदावल्यामुळे, शिक्षणामुळे, राजकीय सामाजिक जाणिवेमुळे, आर्थिक परिस्थितीमुळे या साहित्यकृतीची रुपे अंतर्बाह्य बदलली आहेत. या सर्वच बदललेल्या परिस्थितीला मराठी कादंबरी लेखक सामोरे जाताना दिसतात.

शिक्षकांचे जीवन केंद्रस्थानी ठेवून त्यांचे कुटुंब, विद्यार्थी, पालक, संस्थाचालक, समाज, राजकारणी त्यांच्यातील परस्पर संबंध, शिक्षकांची नैतिकता, सामाजिक बांधिलकी, त्यांचे संस्थाचालकांकडून होणारे शोषण, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, त्यांना मिळणारे अल्पवेतन त्यातून त्यांना आलेले वैफल्य, त्यांच्याविषयी कुटुंबांकडून आणि समाजाकडून असलेल्या अपेक्षा, भावभावना आदि अनेक भावनात्मक पातळीवर संपन्न अशा भावपूर्ण वास्तवाचा आलेख अभ्यासकाला अभ्यास करण्याच्या दृष्टीने मोलाचा वाटतो. या एकूण पार्श्वभूमीवर मी माझा शोधप्रबंध अभ्यासपूर्ण, ससंदर्भ असा लिहिण्यासाठी प्रस्तूत विषय निवडला आहे.

❋ संशोधनाची गृहितके :

१) कादंबरी हा एक लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकाराच्या निर्मितीत शिक्षकांचा सहभाग आहे.

२) कादंबरी या वाङ्मयप्रकारातून शिक्षकांचे जीवनदर्शन प्रभावीपणे चित्रित झाले आहे.

३) शिक्षणाविषयी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. ती भूमिका साहित्यकृतीतून चित्रित झालेली आहे.

४) सामाजिक जीवनात शिक्षकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु प्रतिकुल परिस्थितीत शिक्षकांना संघर्ष करीत जीवनाची वाटचाल करावी लागते ते कसे हे साहित्यकृतीतून स्पष्ट होते.

५) शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी असे विविधांगी पैलू अनेक साहित्यकृतीतून पाहता येतात.

६) शिक्षक आणि शिक्षण हा विचार अधिक महत्त्वाचा असल्यामुळे तो साहित्यकृतीतून ठळकपणे आपल्यासमोर येतो.

७) साहित्यकृतीतील शिक्षक नायक हे केवळ काल्पनिक नाहीत तर ते सखोल जीवनानुभवाच्या चिंतनातून साकार झालेले असल्याने ते अत्यंत महत्त्वाचे वास्तववादी चित्रण आहे.

८) शिक्षण क्षेत्रातील विचार हे सामाजिक जीवनावर प्रभाव टाकणारे असतात. ते सामाजिक बदलास कसे पूरक ठरतात ते कादंबरीतून स्पष्टपणे उलगडते.

९) शिक्षकांचे जीवन वास्तव चित्रित करणाऱ्या साहित्यकृती या सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक जीवनाचे दस्तऐवज म्हणून त्यांच्याकडे पाहता येते.

१०) शिक्षकांच्या जीवनात दिसून येणारा ध्येयवादीपणा मराठी कादंबरीत अत्यंत प्रभावीपणे चित्रित झाला आहे.

११) शिक्षक हा समाजाचा शिल्पकार या भूमिकेतून साहित्यकृतीमधील शिक्षकाचे महत्त्व आत्मसात करणे अधिक यथार्थ वाटते.

❋ संशोधन विषयाची सामग्री

मराठी साहित्यातून कादंबरी या वाङ्मयप्रकारात भरीव आणि विपुल असे लेखन झाले आहे. हे लेखन वैविध्यपूर्ण आणि विविधांगी आहे. त्यातून शिक्षकांच्या जीवनाचे प्रभावी दर्शन घडते. ज्या विविध साहित्यकृतीतून शिक्षकांच्या जीवनाचे दर्शन घडते, अशा उपलब्ध असलेल्या निवडक साहित्यकृतींचे संकलन करून, त्याचबरोबर माझा शोधप्रबंध शिक्षकांचे जीवनदर्शन असल्यामुळे प्रस्तूत विषयाला धरून जे समीक्षा लेखन झाले आहे, अशा समीक्षा ग्रंथांचा, कादंबरीकाराने लिहिलेल्या कलाकृतीवरील समीक्षेचा अवलंब अभ्यासक करतील.

प्रस्तूत विषयाचे संशोधन करण्यासाठी अभ्यासकाला आवश्यक वाटल्यास संशोधनासाठी निवडलेल्या कादंबरीकारांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी संवाद करून त्यांच्या योग्य व उपयुक्त सुचनांचा विचार शोधप्रबंधाच्या लेखनात प्रसंगपरत्त्वे अभ्यासक करतील.

तथापि कोणत्याही साहित्यकृतींच्या निर्मितीमागे प्रबळ अशा वैचारिक प्रेरणा असतात. विविध विचारधारा, चळवळी यांच्या प्रभावातूनही लेखकाने कलाकृतींची निर्मिती केलेली दिसते. कलावंतांच्या निर्मितीमागे ज्या विचार व प्रेरणा आहेत त्या विचारधारेला समजून घेण्यासाठी वैचारिक संदर्भग्रंथांचाही आधार घेऊन शोधप्रबंधाचे लेखन वस्तुनिष्ठ कसे होईल, यासाठी अभ्यासक प्रयत्न करतील.

✻ संशोधनाच्या मर्यादा :

'आधुनिक मराठी कादंबरीतील शिक्षकांचे जीवनदर्शन' हा विषय अभ्यासकाने निवडला असल्यामुळे शिक्षकांच्या जीवनाशी संबंधित घटकांचाच विचार अभ्यासक करतील. प्रत्येक कलाकृतीतून चित्रित झालेले शिक्षकांचे जीवनदर्शन एकसारखे नाही. त्यातील वेगळेपणाचा विचार करताना शैक्षणिक जीवन केंद्रस्थानी ठेवूनच शोधप्रबंधाची मांडणी करता येईल.

शिक्षण क्षेत्र हे व्यापक स्वरुपाचे आहे. एखाद्या कलावंताच्या साहित्यकृतीतून प्रतिबिंबीत झालेल्या जीवनचित्रणाला मर्यादा पडतात. यामुळे साहित्यकृतीच्या मर्यादा संशोधनाला असू शकतात. कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या अनुषंगाने प्रस्तूत संशोधन असल्याने विवेचक साहित्यकृतीच्या आधारे अभ्यासकांनी मांडलेला विचार हा परिपूर्ण विचार आहे, असा दावा करता येत नाही.

काल सुसंगत असा विचार अभ्यासकाने केलेला असल्यामुळे बदलत्या काळातील संदर्भाच्या मर्यादा या संशोधनात राहू शकतात. संशोधक अभ्यासकाचे आकलन, व्यासंग हा साहित्यकृतीच्या आस्वादातून तयार झालेला असल्यामुळे अभ्यासकाच्या अभिरुचीच्या, आवडीच्या किंबहुना विचारांच्याही मर्यादा असू शकतात.

साहित्यकृतीचा लेखक जसे वास्तव जीवन आहे, तसे तो चित्रित करेल असे नाही. अनेकदा लेखकाच्या कल्पनेतील नायक कलावंत निर्माण करीत असतो. त्यामुळे कलावंतांच्या कल्पनेतील जीवनवास्तव खरेखुरे आहे किंवा नाही हे ठरवताना निश्चित व ठाम मते देता येतीलच असे म्हणता येत नाही.

✻ संशोधन पध्दती :

'आधुनिक मराठी कादंबरीतील शिक्षकांचे जीवनदर्शन' या विषयावर शोधप्रबंध लिहिताना अभ्यासक कादंबरी या वाङ्मयप्रकारातील साहित्यकृतीचा आधार घेऊन वर्णनात्मक, विवेचनात्मक, विश्लेषणात्मक, संदर्भान्वयी, अस्वादात्मक, समीक्षात्मक पध्दतींचा उपयोग करून ससंदर्भ लेखन करतील. आवश्यक तेथे विश्लेषणात्मक मांडणीबरोबरच संश्लेषणात्मक, विवेचक विचार अभ्यासक मांडतील.

संशोधन करताना संशोधकास वेळोवेळी जे विचार चिंतनगर्भ वाटतील त्या विचारांची चिंतनशील मांडणी आवश्यक तेथे अभ्यासक करतील. अभ्यासक संशोधकाचे विचार अधिकाधिक जे सत्य आहे ते सुस्पष्ट करण्यासाठी आवश्यक त्या संदर्भाचा आधार घेऊन वस्तुनिष्ठ विचार कसे मांडता येतील, या एका ध्येयाने शोधप्रबंधांचे लेखन अभ्यासक करतील.

एकूणच संशोधनासाठी आवश्यक असलेल्या मूळ साहित्यकृती, अभ्यासपूरक समीक्षाग्रंथ, वाङ्मयीन नियतकालिके, तंत्रज्ञानातून उपलब्ध झालेली माहिती, वृत्तपत्रे, मोबाईल, इंटरनेट या प्रसारमाध्यमांचा आधार

घेऊन संशोधक प्रस्तूत विषयाच्या संदर्भाने आपले विचार नेमकेपणाने मांडतील.

✻ शोध प्रबंधाची प्रकरणे :

✻ प्रकरण पहिले

मराठी कादंबरी : स्वरुप आणि वाटचाल

✻ प्रकरण दुसरे

शिक्षक संकल्पना : स्वरुप व विचार

✻ प्रकरण तिसरे

आधुनिक मराठी कादंबरीतील शिक्षकांचे जीवनदर्शन

✻ प्रकरण चौथे

मराठी कादंबरीतील शिक्षकांचे जीवन : एक चिंतन

✻ प्रकरण पाचवे

मराठी कादंबरीतील शिक्षक : एक मूल्यमापन

✻ प्रकरण सहावे

उपसंहार व निष्कर्ष

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव,
ता.चाकूर, जि.लातूर.

संशोधक

श्री. वाघमोडे नरसिंग सोपानराव
गोपाळ नगर, रिंगरोड, लातूर.
ता.जि. लातूर.

मूळ आधारभूत ग्रंथसूची

क्र.	कादंबरीचे शीर्षक		लेखकाचे नाव
१)	हद्दपार	–	श्री.ना. पेंडसे
२)	बनगरवाडी	–	व्यंकटेश माडगुळकर
३)	मास्तर	–	अण्णाभाऊ साठे
४)	दूर गेलेले घर	–	लक्ष्मीकांत तांबोळी
५)	प्रवाह	–	महादेव मोरे
६)	हऱ्या नाऱ्या	–	त्र्यंबक असरडोहकर
७)	जरीला	–	भालचंद्र नेमाडे
८)	झुल	–	भालचंद्र नेमाडे
९)	गावचा टिनोपाल गुरुजी	–	शंकरराव खरात
१०)	मी मुक्त मी मुक्त	–	शंकरराव खरात
११)	कातळावरचे दिवस	–	श्रीपाद काळे
१२)	झळाळ	–	डॉ. विजया बर्वे
१३)	दुःखाचे श्वापद	–	रंगनाथ पठारे
१४)	कोंडणातलं जिणं	–	नागनाथ पाटील
१५)	कुरुक्षेत्र	–	ह.मो. मराठे
१६)	उघड	–	वामनराव आवळे
१७)	खरे मास्तर	–	विभावरी शिरूरकर
१८)	प्रतिदिन	–	कृष्णचंद्र ज्ञाते
१९)	पागोरा	–	रमेश अंधारे
२०)	पार्टटाईम	–	प्रतिमा इंगोले

अभ्यासपूरक संदर्भ ग्रंथसूची

१)	सुधीर भूमकर	अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र
२)	डॉ. अरविंद दुनाखे	उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक
३)	का.द.बोकील, शकुंतला बापट	शिक्षणाचे शिल्पकार
४)	डॉ. श्री.रा. आचार्य	आधुनिक भारतातील शैक्षणिक प्रबोधन
५)	प्रा.ना.ग. पवार	उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ज्ञ
६)	डॉ. बाबासाहेब गोरे, डॉ. शंकरानंद येडले	शिक्षक ज्ञानदीप
७)	डॉ. शंकरानंद येडले	गुरुधन
८)	के. सागर	संपूर्ण शिक्षणशास्त्र
९)	तेत्सुको कुरोयानागी	तोत्तोचान
१०)	कुसुमावती देशपांडे	मराठी कादंबरी
११)	श्री.मा. कुलकर्णी	कादंबरीची रचना
१२)	ग.ल. जोग	कादंबरी
१३)	चंद्रकांत बांदिवडेकर	मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा
१४)	चंद्रकांत बांदिवडेकर	मराठी कादंबरीचा इतिहास
१५)	उषा हस्तक	कादंबरी आणि मराठी कादंबरी
१६)	बापट आणि गोडबोले	मराठी कादंबरी तंत्र आणि विकास
१७)	आनंद यादव	साहित्य निर्मितीची प्रक्रिया
१८)	चंद्रकुमार नलगे	मराठी वाङ्मयाचा इतिहास
१९)	चंदनशीव भास्कर	भूमी आणि भूमिका
२०)	रा.ग. जाधव	साहित्य आणि सामाजिक संदर्भ
२१)	डॉ. ठाकूर रवींद्र	साहित्य समीक्षा आणि संवाद
२२)	डॉ. ठाकूर रवींद्र	मराठी ग्रामीण कादंबरी
२३)	रा.श्री. जोग	आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
२४)	अ.ना. देशपांडे	आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
२५)	अ.अ. कुलकर्णी	प्रदक्षिणा (खंड १,२)

२६)	गंगाधर गाडगीळ	खडक आणि पाणी
२७)	नरहर कुरुंदकर	धार आणि काठ
२८)	भालचंद्र नेमाडे	टीकास्वयंवर
२९)	केशव मेश्राम	वाङ्मयीन प्रवृत्ती आणि तत्त्वबोध (दादा गोरे गौरवग्रंथ)
३०)	रा.ना.घोटाळे	मराठी वाङ्मय इतिहास
३१)	भीमराव कुलकर्णी	मराठी कादंबरीची वाटचाल
३२)	सं.द. जान्हवी	कादंबरी : एक वाङ्मयप्रकार
३३)	हरिश्चंद्र थोरात	मराठी कादंबरी

टीप – प्रस्तूतच्या संशोधन आराखड्यात संशोधनाला गती येईल तसे आवश्यक त्या ठिकाणी बदल होणे संभवनीय आहे.